Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – I June 2016

# सार्वजनिक वितरण व्यवस्था व अन्न सुरक्षा

प्रा. सोनकांबळे संध्या पुंडलिकराव,
एम.ए.,नेट, एम.लिब.
पीएच.डी., विद्यार्थीनी,
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी.

डॉ. बी. के. शिंदे,
एम. ए., पीएच.डी.,
पीएच.डी., मार्गदर्शक,
ज्ञानोपासक महाविद्यालय ता. जिंतूर, जि. परभणी.

## प्रास्ताविक

सन १९८६ मधील जागतिक विकास अहवालामध्ये अन्न सुरक्षेची जी व्याख्या केली ती म्हणजे देशातील सर्व लोकांना चांगले जीवन जगता यावे यासाठी वेळेवर व पूरेसे अन्न मिळणे म्हणजे अन्न सुरक्षितता होय. भारतीय अन्न–कृषी संघटनेने अन्न सुरक्षिततेची व्याख्या केली आहे ती अशी की अन्न सुरक्षितता म्हणजे देशातील सर्व लोकांना गरजेनुसार केंव्हाही भौतिक आणि आर्थिक जीवन जगण्यासाठी पुरेसे अन्न मिळणे होय.

साधारणत: अन्न सुरक्षा म्हटले की, लोकांकरिता किमान अन्नधान्याची पुर्तता करणे असा मर्यादित अर्थ लावला जातो परंतु या किमान अन्नधान्यामध्ये देखिल योग्य अशी गुणवत्ता व त्याची योग्य मात्रा असणे आवश्यक असते. त्यासाठी प्रथमत: आपला देश हा अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी असेल तरच त्या देशातील वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा किमान पुरवठा करता येतो. तसेच त्यांच्या उत्पन्नात देखिल वाढ करता येते. त्या दृष्टिने भारताचे स्वातंत्र्यापासून योजना कार्यान्वित करून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनविण्यासाठी विविध योजना आखण्यास सुरूवात केली.

अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णत: राखणे नियोजनकाराचे महत्वाचे उद्दिष्ट होते. ज्या देशात अन्नधान्याचा साठा मोठया प्रमाणात केलेला असतो तो देश इतर देशांबाबत ते एक शस्त्र म्हणून वापरतो. याचा अनुभव भारताने घेतला आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या संदर्भात असे म्हटले आहे की, जेव्हा आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनू तेव्हाच आपल्या देशाची प्रगती व विकास संभव आहे. ज्यावेळेस भारतात सन १९६५ आणि १९६६ मध्ये दुष्काळ पडला, तेव्हा अमेरीकन सरकारने पी.एल. ४८० कलमानुसार अन्नधान्याच्या आयातीवर अनेक बंधने लादलेली होती.

सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतात ३६ कोटी लोक दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहेत. तेव्हा त्या सर्वांना अन्नधान्याचा पुरवठा करणे ही सरकारची जबाबदारी आहे. देशातील सर्व लोकांना त्याच्या उपभोगाकरिता आवश्यक अन्न मिळावे यासाठी सरकारने सन २००९ मध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा करण्याची घोषणा केली. त्यानूसार देशातील दारीद्रय रेषेखालील प्रत्येक कुटूंबाना दर महिन्याला ३५ किलो अन्नधान्य ३ रू प्रति किलो या दराने देण्याचे ठरविण्यात आले. देशातील लोकांना अन्नधान्याचा पुरवठा करणे हे सरकारचे आद्यकर्तव्य असल्याने सरकारने हे पाऊल उचलेले आढळून येते.

जागतिक भूवा निर्देशांकानुसार जगातील ८८ देशामध्ये भारत ६६ व्या क्रमांकावर आहे. भारतील मध्यप्रदेश, झारखंड, बिहार, छत्तीसगढ, गुजरात ही राज्य अन्नसुरक्षेपासून अद्यापही बरीच दूर आहेत.देशातील २०० मिलीयन लोकसंख्या आजही अर्धपोटी असून अल्पपोषण, रक्ताल्पता ह्या समस्येने ग्रस्त आहेत.

## उद्दिष्टे :

१) अन्न सुरक्षेचा मार्ग शोधणे.
२) सार्वजनिक वितरण व्यवस्थेची प्रगती व उणिवा तपासणे.
३) सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे पर्याय शोधणे.

**सार्वजनिक वितरण व्यवस्था –**

सार्वजनिक वितरण व्यवस्था ही देशातील लोकांची अन्नसुरक्षितता व समाज कल्याण करण्याचे एक प्रमुख साधन आहे. देशात उत्पादीत होणारे अन्नधान्य लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी सरकारने सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरू केली. या व्यवस्थेच्या स्थापनेमध्ये सरकारचे प्रमुख तीन हेतू होते ते म्हणजे

१) अन्नधान्याच्या किंमतीमध्ये स्थैर्य निर्माण करणे.
२) शेतकऱ्यांसाठी काही शेतमालाच्या आधारभूत किंमती ठरविणे.
३) गरीब लोकांना चांगल्या दर्जाचे अन्नधान्य पुरेशा प्रमाणात व माफक दरात उपलब्ध करून देणे.

ही योजना दोन गोष्टींवर आधारलेली आहे.

अ) किमान आधारभू किंमतीला शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी करणे.
ब) देशभर निर्माण करण्यात आलेल्या स्वस्त धान्य दुकानाच्या साखळीद्वारे गरजु लोकांना अन्नधान्य पुरविणे.

अल्प उत्पन्न गटातील लोकांच्या हिताचे रक्षण करणे ही या योजनेची प्रमुख जबाबदारी आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे अन्न सुरक्षिततेचे एक परिणामकारक जाळे निर्माण करण्यात आले. देशातील दारिद्र्य रेषेखालील आणि दुर्गम भागातील कुटुंबांना प्रामुख्याने निवडक अशा जीवनावश्यक वस्तू परडणाऱ्या किंमतीत उपलब्ध करून देण्याचे सार्वजनिक वितरण व्यवस्था ही प्रमुख माद्य असून शासनाच्या दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमातील तो एक महत्वाचा घटक आहे. ही व्यवस्था शिधा वाटप व स्वस्त धान्य दुकाने यांच्या मार्फत कार्य करते सार्वजनिक वितरण व्यवस्थेकडून अन्नधान्या संबंधीचे वाटप भारतीय अन्नधान्य विभागात काम करण्याचे विशेष पद्धतीचा एक अविभाज्य पैलू आहे. सरकार स्वस्त धान्य दुकानाच्या माध्यमाने स्वस्त धान्य दुकानदाराद्वारे उपभोक्त्यांना प्रामुख्याने आर्थिक मदत म्हणून अन्नधान्य वाटप करते.

सार्वजनिक वितरण व्यवस्था ही केंद्र व राज्य शासन संयुक्त जबाबदारीने चालविते. केंद्र शासनाकडे धान्य खरेदी, धान्याची साठवणूक, राज्यांना एकठोक अन्नधान्यांचे वाटप इत्यादी बाबींची जबाबादरी केंद्र शासनाची आहे तर राज्य शासनाकडे अन्नधान्याचे स्वस्त धान्य दुकानामार्फत गरजू ग्राहकांपर्यंत अन्नधान्याचे वितरण करण्याची जबाबदारी आहे.तसेच राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाची नोंदणी करणे, किंवा शिधा पत्रिकोंच वाटप करणे, शिधा वाटप दुकानाचे पर्यवेक्षण व वार्षिक नियंत्रण करणे, इत्यादी बाबींचा समावेश होतो.

भारतीय सार्वजनिक अन्नधान्य वितरण प्रणालींच्या खुणा दुसऱ्या महायुद्धादरम्यान आणि सन १९४३ च्या दुष्काळात आढळतात. त्यावेळी ब्रिटीश वसाहतीच्या सरकारला देशातील लोकांसाठी एक अन्नधोरण विकसित करण्याची आवश्यकता वाटली. त्यातूनचा सन १९४३ मध्ये सार्वजनिक वितरण प्रणाली अस्तित्वात आली. त्यामध्ये मुंबई प्रांतीय सरकारने अन्नधान्याच्या वितरणात मध्यस्थी करून ती प्रथम या प्रांतात सुरू केली. दुसऱ्या महायुद्धदरम्यान धान्य व्यापाऱ्यांचा तात्वीक कल तपासणे हाच मुख्य उद्देश या प्रणालीचा होता. त्याच बरोबर या शतकात सर्वात वाईट ठरलेल्या दुष्काळाने (सन १९४३ या बंगालमधील दुष्काळ) वितरण व्यवस्थेच्या आवश्यकतेस आधोरेखित केले. म्हणून सरकारने सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा इतर राज्यांमध्ये विस्तार केला. सन १९४७ दरम्यान शहरी भागातील जवळ जवळ ५४ दशलक्ष लोक आणि त्याचबरोबर ग्रामीण भागातील १९ दशलक्ष लोक सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या रूपाने वैधानिक शिधा वाटप कार्यक्रमात सहभागी करण्यात आले.

**सार्वजनिक वितरण प्रणालीतील उणीवा –**

भारतातील सार्वजनिक वितरण प्रणालीने सवलती दरम्यान अन्नधान्याच आदान–प्रादन हा कार्यक्रम गेल्या पाच दशकांपेक्षाही अधिक काळापासून राबविणे सुरू आहे. तरीसुद्धा तीची अन्न सुरक्षा वाढवण्याची परिणामकारकता संशयास्पद राहीली आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था ही विशिष्ट विभागात आणि लोकसंख्येच्या विविष्ट विभागात फायद्यामध्ये राहिली आहे. ही व्यापकपणे एक शहरी प्रक्रिया आहे. जेथे पुरवठयाचा मुख्य वाटा जातो. देशातील केंद्रभुत ठिकाणे जी शहरी भागामध्ये आहेत ती मोठया प्रमाणावर लाभास पात्र ठरली आहे. परंतु ग्रामीण लोकसंख्येकरिता सार्वजनिक वितरण व्यवस्था एक अप्रासंगिक बाब आहे.

सार्वजनिक वितरण प्रणालीच्या कार्यान्वन आणि हिशेब या बाबतीतील गरिबी कमी करण्याचा प्रकल्पांतर्गत केल्या गेलेल्या अनेक अभ्यासाने या वितरण प्रणालीच्या अनेक उणिवा त्याच बरोबर जमेच्या बाजू उघड केल्या आहेत. संबंध देशाचा विचार करता सार्वजनिक वितरण प्रणालीचे गरीब कुटूंबाच्या अन्नधान्याच्या आवश्यकता पुरेशा व समाधान कारक नसतील तरीही ग्रामीण भागातील भेदभावाकरिता या व्यवस्थे दोष देता येत नाही. गरीब कुटुंब १६ टक्क्यांपेक्षा कमी तांदळू व गहू खरेदी करतात. त्याहूनही वाईट म्हणजे सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे एकूण लोकसंख्येच्या केवळ ५ टक्यांपेक्षाही कमी अन्नधान्य प्राप्त करतात. राज्य पातळीवरील चित्र मात्रच फारच वेगळे आहे. हरियाणा राज्यात सार्वजनिक वितरणी प्रणालीची रचना ग्रामीण भागातील गरीबीमध्ये सुधारणा करण्याचे साधन म्हणून करण्यात आलेली नाही. याउलट बिहारमधील सार्वजनिक वितरण प्रणाली केवळ अति गरीबांच्या जीवनाला स्पर्शून जाते.

आर्थिक मदतीशिवायची किंमत सार्वजनिक वितरण प्रणालीच्या अन्नधान्याच्या किंमतीपेक्षा खुल्या बाजारातील प्राप्त किंमतीपेक्षा जास्त असतो. प्राप्त धान्याच्या वितरणात प्राप्त प्रासंगीकता साठा, वाहतूक आणि इतर प्रशासकीय किंमत यांचाही अंतर्भाव असतो, चोरी, अपव्यय आणि साठयामधील इतर प्रकारचे नुकसान आणि मालास एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेल्यामुळे किंमतीत वाढ होते. ह्याप्रकारे वाढलेल्या किंमतीचा सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गरीबांना अन्नधान्य पुरवतांना अनेक समस्या निर्माण होतात हे विशेष करून दोन कारणामुळे गडते. कारण सार्वजनिक वितरण प्रणालीची अन्नधान्यास आर्थिक मदतीची तरतूद पर्वापर्यंत सार्वत्रिक राहिलेली आहे अणि गरीबांना विशिष्ठ पद्धतीने लक्ष न केल्या गेल्यामुळे आर्थिक मदतीचा मोठा हिस्सा गरीब नसलेल्यांकडे गेला आहे. ही घटना भ्रष्टाचाराच्या मार्गाने आर्थिक मदतीवरील धान्य गळतीच्या मार्गाने खुल्या बाजारात नेण्यास प्रवृत्त करणारी आहे.

सार्वजनिक वितरण प्रणाली अनेक समस्यांचा सामना करते. त्यामुळे ती खऱ्या उद्देशांना अनुसरून कार्य करू शकत नाही. असा युक्तीवाद केला जातो की, शेतकऱ्यांनी दिली जाणारी आधारभूत किंमत, अन्नधान्याच्या किंमतीतील स्थिरता, अर्थ व्यवस्थेची एकंदरीत वाढ या अनेक अप्रत्यक्ष कारणांमुळे सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये उणीवा निर्माण होत आहेत.

**सार्वजनिक वितरण व्यवस्थेस पर्याय –**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर सरकारकडून मोठया प्रमाणात अनूदान दिल्या जाते. त्यामुळे सरकारवर याचा फार मोठा बोजा पडतो. त्यामुळे सरकार या व्यवस्थेस पर्यायी व्यवस्था शोधण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यासाठी तज्ञव्यक्तींनी वारंवार असे सुचवले आहे की सार्वजनिक वितरण प्रणालीस विविध रोजगार हमी योजनेशी जोडण्यात आले पाहिजे. कारण त्यामुळे रोजगार हमी योजनावरील व्यक्तींमध्ये उत्कृष्ट स्वावलंबन निर्माण होऊ शकते. त्याकरिता रोजगार हमी ही पुर्नवसन कार्यक्रमाच्या पलीकडे पोहचली पाहिजे आणि म्हणूनच रोजगार हमी आणि अन्न सुरक्षा ही सार्वजनिक वितरण प्रणालीची अत्यावश्यक अंगे होऊ शकतात. कारण जर खरेदी करणाऱ्या शक्तीचा अभाव असेल किंवा अर्थव्यवस्थेत पुरेशा अन्नधान्याचे उत्पादन आहे नाही तरीही सन १९९६ या जागतिक अन्न परिषदेने निर्देशीत

केल्याप्रमाणे विविध समस्यांचा गरीबांना सामना करता येऊ शकेल.

आर्थिक मदत कमी करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने सन १९९० च्या पूर्वार्धात सार्वजनिक वितरण प्रणालीच्या किरकोळ किंमतीत अनेकदा वाढ केली आहे. (परंतु प्राप्त किंमती खाली आणण्याच्या कधीही विचार केला नाही) याचाच अर्थ म्हणजे खुल्या बाजारातील धान्याच्या किंमती आणि सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत धान्याच्या किंमती कमी झाल्या आणि सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत उपयोगी वस्तू विकत घेण्याची उपभोक्त्यांची इच्छाशक्ती भरीवपणे कमी झाली.

सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये असलेल्या अनेक उणीवा किंवा कमतरता तत्परतेने स्विकारऱ्यात आले. सार्वजनिक वितरण व्यवस्थेची सर्वाधिक किंमत आणि तिची ग्रामीण भागातील गरीबांपर्यंत पोहोचण्याच असमर्थता ह्या मोठया उणिवा आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या विरोधात होणाऱ्या टिकेवर लक्ष ठेवण्याची गरज आहे. अधिक महत्वाचे म्हणजे या सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील उपाय व पर्याय हे सुचवल्या व बनवल्याप्रमाणे राहिले नाहीत. सार्वजनिक वितरण प्रणालींचे फायदे हे निव्वळ गरीबांकडे पुन्हा वळणारे व तीची किंमत व अन्नधान्यातील पोषणतत्व याबाबतीतला प्रभाव हे अधिक गरजेचे आहे.

संदर्भ :

१) ओझा एन. एन. : भारत मे खाद्यान्न भंडारण, कॉनिकल वर्ष २०, अंक ३ पा. क्र. २०.
२) Kumar Praveen; Force Security; The Challenges Ahead Yojana, Vol 54. October 2010, P., 30.
३) पायलीमोडे योगेश;भारतातील अन्न सुरक्षेचे परिदृष्य, योजना वर्ष ३८, अंक ३ ऑक्टोबर २०१० पा. क्र. २२.